दिनांक २२.११.२०१७ रोजी गोपनिय सुत्राकडुन मिळालेल्या माहितीच्या आधारे मा. महेंद्र पंडीत अपर पोलीस अधिक्षक गडचिरोली यांचे आदेशान्वये व मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा गडचिरोली येथील पोलीस उप निरीक्षक युवराज घोडके, सोबतचे पथकातील भाऊराव बोरकर, प्रदिप चवरे वैशाली चव्हाण अशा प्रकारचा पोलीस पथक मौजा मुळझ्रा गावाकडे जाणारे रोड दरम्यान सापळा रचुन बसले असता, एका महिंद्रा बोलेरो पिकअप चारचाकी वाहन क्रमांक एम.एच ३० ए.बि. ४७८२ या वाहनामध्ये एकुन ५५,०००/- रुपये किमंतीचे एकुन ६ बैलांना (जणावरे) एकमेकांचे पाय दोरांने घट्ट बांधुन अपु-या जागेत जबरीने कोंबुन निदर्यपणाने व क्रुरतेने त्यांना कत्तलीकरीता विक्री करण्याचे उद्देशाने बेकायदेशिररित्या वाहतुक करीत असतांना आरोपी नामे १. मोहम्मद तसव्वर अब्दुल समद २ निजामुदिन अमीनउदिन दोन्ही रा. मुर्तीजापुर जिल्हा अकोला असे मिळुन आल्याने नमुद बैलांच्या सुरक्षीततेकरीता त्यांना मौजा लांझेडा येथील कोंडवाडयात तात्पुरती व्यवस्था करण्यात आली. नमुद इसमांचे ताब्यातील एकुन ४०००००/- रुपये किमतीचे बैलांचे वाहतुकीकरीता वापरलेली चारचाही वाहन जप्ती करुन यातील नमुद इसमा विरुध्द पोलीस स्टेशन गडचिरोली येथे कादेशिर कारवाई करुन त्यांना अटक करण्यात आली आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक गडचिरोली यांचे मार्गदर्शनाखाली सुरु आहे.